**<u>: – नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६०/२०१७ मधील नि. ९३ खालील आदेश –:</u>**

(आनंद नारायण सावंत व.५ विरुध्द रघुनाथ महादेव मोर्ये व.)

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १अ हिचे वारस या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ब ते १य हेच वारस आहेत अशी मुळ दाव्यात नोंद करणेस परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथन असे की, प्रतिवादी क्र. १अ. पार्वती रघुनाथ मोर्ये हया दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मयत झालेली असून तिच्या पश्चात तिला तिचा एक मुलगा श्रीकृष्ण रघुनाथ मोर्ये (म्हणजेच प्रतिवादी क्र.१ब) तसेच एकूण ७ विवाहीत मुली म्हणजेच अनुक्रमे प्रतिभा गणपत धुरी (म्हणजेच प्रतिवादी क्र.१क), मनिषा मनोहर वाडकर (म्हणजेच प्रतिवादी क्र.१ड), राजश्री रामा मुंडये (म्हणजेच प्रतिवादी क्र.१इ), रुपम रमाकांत पावसकर (म्हणजेच प्रतिवादी क्र.१फ), सुचिता संतोष मसुरकर (म्हणजेच प्रतिवादी क्र.१ग), अश्विनी अशोक पाळांबे (म्हणजेच प्रतिवादी क्र.१ह), रेखा रविंद्र वझरकर (म्हणजेच प्रतिवादी क्र.१य) असे एकूण ८ जवळचे कायदेशीर वारस (मुले) असून त्यांचेशिवाय मयत प्रतिवादी क्र. १अ हिला अन्य कोणीही जवळचे वारस नाहीत व सदरचे कायदेशीर वारस या दाव्यात प्रतिवादी क्र. १ब ते १य म्हणुन या दाव्यात यापूर्वीच पक्षकार म्हणुन रेकॉर्डवर दाखल असल्यामुळे सदरहु वारसांना या दाव्यात वेगळे वारस म्हणुन सामील करण्याची गरज नाही. तरी मुळ दाव्यात तशी नोंद करण्यात यावी अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ब ने सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश पारित करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा हक्कप्रस्थापनेसाठी, ठराव होऊन मिळणेसाठी व कायमची ताकिदीकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १अ. पार्वती रघुनाथ मोर्ये हिचे मृत्यु पश्चात तिला तिचा मुलगा श्रीकृष्ण रघुनाथ मोर्ये (म्हणजेच प्रतिवादी क्र.१ब) तसेच एकूण ७ विवाहीत मुली म्हणजेच अनुक्रमे प्रतिभा गणपत धुरी (म्हणजेच प्रतिवादी क्र.१क), मनिषा मनोहर वाडकर (म्हणजेच प्रतिवादी क्र.१ड), राजश्री रामा मुंडये (म्हणजेच प्रतिवादी क्र.१इ), रुपम रमाकांत पावसकर (म्हणजेच प्रतिवादी क्र.१फ), सुचिता संतोष मसुरकर (म्हणजेच प्रतिवादी क्र.१ग), अश्विनी अशोक पाळांबे (म्हणजेच प्रतिवादी क्र.१ह), रेखा रविंद्र वझरकर (म्हणजेच प्रतिवादी क्र.१य) हे कायदेशीर वारस आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ अन्वये *"दाव्यातील वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास आणि दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास अशा वादी किंवा प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते."*

**०६.** प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १अ पार्वती रघुनाथ मोर्ये हया दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. प्रस्तुतचा दावा, हक्कस्थापनेसाठी, ठराव होऊन मिळणेसाठी व कायम ताकिदीकरीता दाखल केला असल्याने प्रतिवादी क्र. १अ यांचे वारस देखील सदर दाव्यातील आवश्यक पक्षकार असून ते प्रस्तुत दाव्यामध्ये पुर्वीपासूनच सामिल आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १अ ही मयत झालेने तिच्या नावापुढे "मयत वारस यातील प्रतिवादी क्र. १ब ते १य हेच तिचे वारस आहेत". यानुसार दाव्याचे रेकॉर्डमध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देणे संयुक्तीक ठरेल. रेकॉडवर दाखल करणेस झालेला विलंब नि. ९२ कडील अर्जावरील आदेशान्वये माफ करण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १अ विरुध्द 'दावा उपशमित' झालेबाबतचा आदेश नि. ९१ कडील आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांना मयत प्रतिवादी क्र. १अ हिचे प्रतिवादी क्र. १ब ते १य हेच तिचे वारस आहेत अशी अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात व दावा रजिस्टरमध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.03.10 18:44:36 +0530

दिनांक– ०५/०३/२०२५

(प.रा.ढोरे )
सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.